म वि नि आ

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी क्र.** (०२२) २२१६ ३९ ६४ / ६५ / ६९, **फॅक्स क्र.** : (०२२) २२१६ ३९ ७६
**ई-मेल :** mercindia@merc.gov.in **संकेतस्थळ :** www.merc.gov.in

जाहिरात क्र. : १६/२०१३-१४

# निविदा सूचना

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास निम्नलिखित कामांमध्ये सहाय्य करण्यासाठी सल्लागारांची नामसूची तयार करण्याबाबत**

**अ : तांत्रिक विषयक काम,** **ब : नियमन विषयक काम** **क : विधी विषयक काम**

विद्युत अधिनियम, २००३च्या कलम ८६ अंतर्गत **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून (आयोग)** महाराष्ट्र राज्यात विविध प्रकारची, प्रामुख्याने, वीज दर निश्चित करणे, विजेची निर्मिती, पारेषण आणि वहन करणे, विजेचा ठोक किंवा किरकोळ पुरवठा करणे, जसे असेल तसे, आणि विद्युत वितरण परवानाधारकांची वीज खरेदी आणि वीज प्राप्त करून घेण्याच्या प्रक्रियेचे नियमन करणे, पारेषण परवानाधारक, वितरण परवानाधारक आणि विजेचे व्यापारी म्हणून काम करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना परवाना मंजूर करणे तसेच सह-निर्मितीस व नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून विजेची निर्मिती करण्यास चालना देणे इ. कामे करण्यात येतात.

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगा**ला आपली कामे प्रभावीपणे पार पाडणे शक्य व्हावे यासाठी आयोगाने तांत्रिक अर्हता प्राप्त आणि व्यावसायिक व्यवस्थापन असलेल्या सल्लागारांच्या फर्म्स / संस्थांची नामसूची तयार करण्याचे ठरविले आहे.

कामाची व्याप्ती, पात्रता आणि आवश्यक अर्हता, स्वारस्य अभिव्यक्तीचा नमुना आणि कार्यपद्धती त्याचप्रमाणे स्वारस्य अभिव्यक्तीच्या मूल्यांकनाची पद्धती, इ. बाबतचा सविस्तर तपशील तांत्रिक, नियमन आणि विधिविषयक कामांसाठी स्वतंत्रपणे खालील शीर्षकांखाली आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | संकेत-स्थळांशी जोडणी (लिंक) |
|---|---|---|
| अ | **तांत्रिक बाबींशी संबंधित कामेः-**<br>भाग-१ : वीज दर निश्चित करणे.<br>भाग-२ : ऊर्जा कार्यक्षमता आणि वीज मागणी व्यवस्थापन.<br>भाग-३ : सह-निर्मिती आणि नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून निर्मिती.<br>भाग-४ : विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत सोपविण्यात आलेली अन्य कार्ये पार पाडणे आणि परवानाधारकांनी द्यावयाच्या दर्जेदार सेवेसाठी मानके ठरवून देणे. | ToR for Technical Tasks |
| ब | **नियमन विषय कामे :-**<br>भाग-१ : विनियमांचा आढावा घेणे व सुधारणा करणे.<br>भाग-२ : विजेचे पारेषण, वितरण आणि व्यापारासाठी परवाना मंजूर करणे.<br>भाग-३ : वीज निर्मिती कंपन्या आणि वितरण परवानाधारक यांच्यातील वाद आणि वीज खरेदी करारासंबंधित (पीपीए) वादांबाबत अभिनिर्णय देणे.<br>भाग-४ : विद्युत नियमानाची क्षमता वाढविणे. | ToR for Regulatory Tasks |
| क | **विधीविषयक कामे**<br>१. प्रारुप आदेशात विधी संबंधित दुरुस्त्या करणे.<br>२. विद्युत अपील न्यायाधीकरणाने दिलेल्या निकालांचा अभ्यास करणे आणि त्यावर विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १२५ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयात अपील करणे अथवा न करण्याच्या इष्टतेबाबत आयोगास सल्ला देणे.<br>३. आयोगाने पारित केलेल्या आदेशांचा विद्युत अपील न्यायाधिकरण आणि उच्च न्यायालय / सर्वोच्च न्यायालयात बचाव करणे.<br>४. आयोगास आवश्यक तेव्हा विधीविषयक सल्ला / मत देणे.<br>५. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ अंतर्गत व्याख्या करण्यात आलेल्या संबंधित लागू असलेल्या परवान्यांच्या शर्ती आणि मानीव वितरण परवान्याच्या सद्यस्थितीच्या संदर्भात विधिविषयक प्रश्न निश्चित करणे आणि सोडविणे. | ToR for Legal Tasks |

सल्लागारांची फर्म / संस्था, आपल्या तांत्रिक अर्हतेनुसार, वरीलपैकी कोणत्याही एक किंवा दोन किंवा सर्व तिन्ही कामांसाठी त्यांची निविदा आयोगास सादर करू शकेल.

इच्छुक सल्लागार फर्म्स / संस्थांनी त्यांची स्वारस्य अभिव्यक्ती आयोगाकडे दिनांक : **२१ फेब्रुवारी, २०१४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत कृपया सादर करावी.**

स्वाक्षरी/-
**सचिव**
मविनिआ

**मुंबई**
दिनांक : २२ जानेवारी २०१४

**SIZE : 12 (W) X 21 (H) = 252 SQ. C. M.; CAPTION KEY NO. TASKS (M)**